२

स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्ती यांना द्यावयाच्या पेन्शन व इतर सवलती देणे — जिल्हास्तरावरील स्वातंत्र्य सैनिक गौरव समित्या.

मुद्रित नस्ती पराची

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:पीओआर-१०८२/जि.स्वासैस/विक-१/स्वासै,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२६ नोव्हेंबर, १९८२

स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाच्या आर्थिक व इतर सवलती संबंधात शासनास शिफारशी करण्यासाठी शासनाने श्री. गुलाबराव पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने केलेल्या शिफारशी-पैकी एक शिफारस खालील स्वरुपाची होती.

१. स्वातंत्र्य सैनिकांच्या पेन्शन प्रकरणांची व त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्यासंबंधीच्या प्रकरणांची छाननी करुन शासनाला सल्ला देण्याकरीता जिल्हास्तरावर स्वातंत्र्य सैनिक गौरव समित्या नियुक्त करण्यात याव्यात. या समित्यांचे कार्यक्षेत्र जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या अधिकृत व कायम स्वरुपाच्या याद्या तयार करणे, ज्या प्रकरणी निःसंदिग्ध पुरावे उपलब्ध नसतील अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रकरणी शासनाला शिफारशी करणे तसेच स्वातंत्र्य सैनिकांचे वय, सेवा श्रेष्ठता, वगैरे लक्षात घेऊन पेन्शनमध्ये वाढ सुचविणे आणि अपवादात्मक खास प्रकरणी स्वातंत्र्य सैनिक अगर त्यांच्या योग्य वारसाला एक रकमी अनुदान अगर पेन्शन सुचविणे वगैरे राहील.

२. या शिफारशीच्या अनुषंगाने शासन सोबत जोडलेल्या विवरण पत्रात दर्शविल्या-प्रमाणे जिल्हा निहाय स्वातंत्र्य सैनिक गौरव समित्या स्थापन करीत आहे. या समितीवर जिल्हाधिका-यांचे प्रतिनिधी म्हणून एक उपजिल्हाधिकारी समितीला मदत करण्यासाठी सदस्य सचिव म्हणून रहातील. समितीच्या शिफारशीवर शासनाला अंतिम शिफारस करण्याचा अधिकार जिल्हाधिका-यांना राहील.

३. समितीने केलेल्या कार्याचा व शिफारशींचा अहवाल दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शासनाकडे (सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२) यांचेकडे पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व. गो. ठाकूर ),
सह सचिव
महाराष्ट्र शासन.

प्रति,
१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. अध्यक्ष, उच्चाधिकार समिती,
४. कार्याध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
५. श्री. गोविंदभाई श्रॉफ, सदस्य,
६. श्री. मनोहर वाम. जळगांवकर, सदस्य,
७. श्री. डी. व्ही. पुरोहित, सदस्य,
८. श्री. रामजी पाटील, सदस्य सचिव,
९. अपर मुख्य सचिव,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७. वित्त विभाग, ईएक्सपी-४,
१८. मंत्रालयातील इतर विभाग,
१९. माहिती व जनसंपर्क अधिकारी, [प्रसिध्दी पत्रक काढण्यासाठी].

एशांजा२५२९४.